**समरी फौजदारी खटला क्र.५०/२०२० मधील**
**निशाणी क्र. ४३ वरील आदेश**
**सीएनआरनं.एमएचएसआय०६–०००२८८–२०१९**

१. प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीतर्फे दाखल करणेत आलेला असून, त्यायोगे मुदत मागणी करणेत आलेली आहे. फिर्यादीच्या मते, त्यांना प्रस्तुतकामी महत्त्वाची कागदपत्रके हजर करणेची असून, सदर कागदपत्रके आजरोजी उपलब्ध न झालेने हजर करणे अडचणीचे आहे. त्यामुळे सदरकामी मुदत मिळणे जरुरीचे आहे.

२. आरोपीतर्फे विधिज्ञ यांनी सदर अर्जास सविस्तर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. आरोपी यांच्या मते, फिर्यादीतर्फे साक्षीदार यांनी दि.०९/१२/२०२१ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले असून, तद्नंतर वेळोवेळी साक्षीदार गैरहजर राहत आहेत. आरोपीतर्फे विधिज्ञ हे साक्षीदाराचा उलटतपास घेणेस तयार असून देखील साक्षीदार उलटतपासाकरिता उपलब्ध नाही. साक्षीदाराचा सरतपास पूर्ण झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

३. फिर्यादी साक्षीदार क्र. १ आजरोजी न्यायालयात उपस्थित. फिर्यादी व आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणातील रोजनाम्याचे अवलोकन केले असता, दि. ०९/१२/२०२१ रोजी फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचे निशाणी क्र. ६ लगतचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नोंदवून घेणेत आलेले असून, त्याचदिवशी त्यांचा उर्वरित जादा सरतपास नोंदविणेत आलेला दिसून येत आहे व दि.०९/१२/२०२१ रोजी सदरचे प्रकरण हे फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ याचा आरोपीने उलटतपास घेणेवर नेमणेत आलेले आहे. तद्नंतरच्या रोजनाम्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी व आरोपी दोन्ही पक्षाचे वतीने वेळोवेळी मुदत अर्ज सादर करणेत आलेले आहे. दि. २३/११/२०२२ रोजी माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत केलेला होता. सदरचा आदेश दि. ०३/०२/२०२३ रोजी निशाणी ३३ लगत पारीत झालेल्या आदेशाप्रमाणे रद्द करणेत आलेला दिसून येत आहे. तद्नंतर सदरचे प्रकरण हे साक्षीदार क्र. १ यांच्या उलटतपासाकरिता प्रलंबित असताना पुढील नेमले तारीखेस म्हणजेच दि.१७/०२/२०२३ रोजी फिर्यादीतर्फे व दि. ०३/०३/२०२३ रोजी आरोपीतर्फे मुदत अर्ज सादर करणेत आलेला आहे. तद्नंतर दि.

१८/०४/२०२३ रोजी फिर्यादीतर्फे निशाणी ४० लगत मुदत अर्ज दाखल करणेत आलेला दिसून येत आहे. सदरचा अर्ज माझे पूर्वधिकारी यांनी शेवटची संधी म्हणून मंजूर केलेला आहे व पुढील नेमले तारीखेस साक्षीदारास हजर ठेवणेबाबत निर्देश देखील देणेत आलेले आहेत. तद्नंतर पुढील नेमले दोन तारीखेस आरोपीतर्फे मुदत अर्ज दाखल करणेत आलेले आहेत. सदरचे अर्ज मंजूर करणेत आलेले आहेत.

५. प्रस्तुत सर्व अभिलेखाचे वाचन केले असता, प्रस्तुतचे प्रकरण हे आजरोजी फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास घेणेकरिता नेमणेत आलेले आहे. सदरचे प्रकरण हे दि.०९/१२/२०२१ रोजीपासून उलटतपासाकरिता प्रलंबित आहे. फिर्यादीपक्षास कागदपत्रके सादर करणेसाठी पुरेसा अवधी देणेत आलेला आहे. तसेच निशाणी ४० लगत सादर करणेत आलेल्या मुदत अर्जावर माझे पूर्वाधिकारी यांनी शेवटची संधी म्हणून अर्ज मंजूर केलेला आहे. आजरोजी प्रस्तुतचे प्रकरण हे उलटतपासाकरिता प्रलंबित असताना फिर्यादीने कागदपत्रके सादर करणेच्या कारणाकरिता मुदत मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा सरतपास यापूर्वीच नोंदवून पूर्ण झालेला आहे. तद्नंतर देखील फिर्यादी पक्षास कागदपत्रके सादर करणेची झालेस ती कागदपत्रके फिर्यादीपक्षास केव्हाही सादर करणेची मुभा असणार आहे. त्यासाठी आजरोजीचे उलटतपास प्रलंबित ठेवणे न्यायोचित ठरणारे नाही. फिर्यादीने अर्जात नमूद केलेले कारण समाधानकारक वाटत नाही. सबब, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटत नाही. यास्तव मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करणेत येतो.

DURGA BHAGAWAN SUTAR

Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2023.08.02 18:51:33 +0530

[श्रीमती.डी.बी.सुतार ]

दिनांकः ०२/०८/२०२३. न्यायदंडाधिकारी वर्ग–१, सावंतवाडी.